महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: एमडीआर-१३२५/प्र.क्र.२१/२०२५/जाहिरात दिनांक: १४ ऑगस्ट, २०२५

# -: शुद्धिपत्रक :-

## औषध निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन, गट-ब
## (जाहिरात क्रमांक: ११६/२०२५)

शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या मागणीपत्रानुसार औषध निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन, गट-ब संवर्गाच्या १०९ पदांच्या भरतीकरीता दिनांक २९ जुलै, २०२५ जाहिरात (जाहिरात क्रमांक-११६/२०२५) प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२.** शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या शासन पत्र क्रमांक:- एफडीस-२०२४/प्र.क्र. १००/२४/औषधे-१, दिनांक १२ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त अभिप्रायानुसार केंद्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाच्या दिनांक १६ जुलै, २०१९ रोजीच्या अधिसुचनेतील तरतुद विचारात घेता **Pharm.D** ही शैक्षणिक अर्हता, Degree in Pharmacy or Pharmaceutical Science करीता ग्राह्य धरण्याबाबत कळविण्यात आले आहे. **त्यानुसार Pharm. D ही शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पात्र उमेदवारांकडून प्रस्तुत संवर्गाकरीता अर्ज मागविण्यात येत आहेत.**

**३.** उपरोक्त अर्हतेचा समावेश करण्यात आल्यामुळे, जाहिरात क्रमांक ११६/२०२५- औषध निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन, गट-ब संवर्गास अनुसरून अर्ज सादर करण्याच्या प्रक्रियेस खालीलप्रमाणे मुदतवाढ देण्यात येत आहे:-

| अ.क्र. | तपशील | विहित कालावधी |
|---|---|---|
| १ | अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक | दिनांक २९ ऑगस्ट, २०२५ रोजी २३.५९ |
| २ | ऑनलाईन पध्दतीने विहित परीक्षा शुल्क भरण्याकरीता अंतिम दिनांक | दिनांक २९ ऑगस्ट, २०२५ रोजी २३.५९ |
| ३ | भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरण्यासाठी चलनाची प्रत घेण्याचा दिनांक | दिनांक ३१ ऑगस्ट, २०२५ रोजी २३.५९ |
| ४ | चलनाद्वारे परीक्षाशुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | दिनांक ०१ सप्टेंबर, २०२५ रोजी बँकेच्या कार्यालयीन वेळेमध्ये |

**४.** दिनांक २९ जुलै, २०२५ रोजी प्रसिध्द मूळ जाहिरातीमधील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

**५.** सदर शुध्दिपत्रक व मूळ जाहिरात क्रमांक ११६/२०२५ आयोगाच्या https://mpsc.gov.in तसेच https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

उप सचिव, जाहिरात

ठिकाण: नवी मुंबई

महाराष्ट्र लोकसेवा आयोग